30/3/93

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती

---

काकाकुआँ मॅन्शन, ५४ बुधवार पेठ, पुणे. दि. ३० मार्च ९३

---

:0: परिपत्रक नं. ६ :0:

२० एप्रिल ९३ रोजी मुंबई विधान सभेवर शेतमजूरांचा मोर्चा.

प्रिय साथी
क्रान्तीकारी अभिवादन ।

समन्वय समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे २८ मार्च ९३ रोजी शेतमजूर व रोजगार हमी कामगारांची विभागीय परिषद औरंगाबाद येथे संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन कॉ. भास्करराव जाधव यांनी केले. परिषदेस मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यातून शेतमजूर प्रतिनिधी उपस्थित झाले होते., तद्वतच कोल्हापूर, पुणे, नगर, नाशिक, ठाणे, धुळे येथील प्रमुख कार्यकर्ते सहभागी झाले होते.

समन्वय समितीच्या घटक संघटनांचे बहुतांश प्रतिनिधी परिषदेला आले असल्याने, दूस-या दिवशी म्हणजे २९ मार्च रोजी होणारी समन्वय समितीची बैठक परिषदेनंतर त्याच ठिकाणी घेण्यात आली. मात्र यामुळे जळगांवचे कॉ. व्ही. बी. मोरे व सटाण्याचे कॉ. गजानन लोके यांची गैरसोय झाली त्याबद्दल समन्वय समिती दिलगीर आहे.

समन्वय समितीच्या बैठकीस साथी खुसले अप्पा, साथी प्रकाश शिन्दे, साथी चंद्रसेन कळवणकर, साथी सुधाकर आरसूड, साथी सूर्यभान बनकर, एस. वाय. कुलकर्णी, साथी सुभाष लोमटे ( शेतकरी शेतमजूर पंचायत ), कॉ. जीवनराव सावंत, कॉ. भास्करराव जाधव, कॉ. भीमराव बनसोड, कॉ. सांडू जाधव, कॉ. जनार्धन भोवते, कॉ. प्रकाश बोधवडे, (शेतमजूर परिषद ) कॉ. कुमार शिराळकर, कॉ. उध्दव भवलकर ( म. रा. शेतमजूर युनियन - लाल बावटा ) कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. बुध्दीनाथ बराल, कॉ. विठ्ठल कदम ( म. रा. शेतमजूर युनियन ) साथी रा. वि. भुस्कुटे, लहू पासारे ( श्रमजीवी संघटना ) शांताराम पंदेरे, अजित सरदार ( लोक समिती - युक्रांद ) रामभाऊ वाडू (भूमिसेना ), अशोक कुलकर्णी (रचनात्मक संघर्ष समिती) शिवाजी नानेकर ( गरीब डोंगरी संघटना ). इ. प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते

बैठकीत प्रामुख्याने अर्थसंकल्पी अधिवेशनावर एप्रिल महिन्यात न्यावयाच्या मोर्चा संबंधी चर्चा झाली. मागील बैठकीत २० एप्रिल ९३ रोजी शेतमजूरांचा

पान नं. २

मोर्चा काढून बेमुदत धरणे धरावीत असा कार्यक्रम ठरला होता. पण त्यासाठीची समन्वय समितीच्या घटक संघटनांची तयारी व सद्य राजकीय स्थिती लक्षांत घेता २० एप्रिल रोजी विधान सभेवर फक्त मोर्चा न्यावा असा निर्णय सर्वानुमते झाला.

मोर्चासाठी २० एप्रिल रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत समन्वय समितीच्या घटक संघटनांनी मोर्चासाठी मोठ्या संख्येने जमायचे आहे. आपल्या भाग वा जिल्ह्यातून किती संख्येने सहभागी होत आहात ते खालील पत्त्यावर लवकरात लवकर कळवावे.

साथी सुभाष लोमटे, १२५ समर्थनगर, औरंगाबाद ( ४३१ ००१)

मुंबई मोर्चाच्या तयारीसाठी सर्व घटक संघटनांनी आवश्यक पत्रक / पोस्टर्स वा इतर प्रचार आपापल्या करावयाचा आहे. याची नोंद घ्यावी या संदर्भात आपण काय करत आहात हेही पत्राने कळवाल अशी अपेक्षा.

आपल्या पत्राची वाट पहात आहे.

आपला,

सुभाष लोमटे

( सुभाष लोमटे )

सोबत :

नमुना पत्रक जोडले असून आवश्यक बदल करून मोर्चाचे तयारीसाठी ते छापून आपापल्या भागात त्याचे वाटप करावे.

– बुक – पोस्ट –

प्रति

साथी अजित सरदार

'सुमाय'

आपटे रोड

शिवाजीनगर, पुणे

प्रेषक :

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती.